## नियमीत दिवाणी दावा नं.२८३/२०१३ मधील नि.९६ खालील आदेश
**CNR : MHSN06001354-2013**
**(रावसाहेब तारदाळे वि. तात्यासाहेब तारदाळे आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द सरस–निरस मानाने तुटक वाटप होऊन प्रत्यक्ष कब्जा मिळणे करिता दाखल केलेला आहे. सदर दावेकामी प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबुराव तारदाळे हे दि.०५/०९/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबुराव तारदाळे यांना खालील प्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

**प्रतिवादी क्र.०२ – दादासो बाबुराव तारदाळे (मयत)**

**२/१ श्रीमती वर्षाराणी दासासो तारदाळे**
व. व. ४८, व्यवसाय घरकाम

**२/२ श्री. हरीष दादासो तारदाळे**
व. व. २४. व्यवसाय शेती

**२/३ श्री. हर्षद दादासो तारदाळे**
व. व. २८, व्यवसाय शेती - सर्व
रा. मालगांव ता. मिरज जि. सांगली.

मयत दादासो बाबूराव तारदाळे यांना वर नमुद केलेप्रमाणे २/१ ह्या पत्नी असून २/२ ते २/३ ही मुले या नात्याने कायदेशीर वारस आहेत. याशिवाय मयत दादासो बाबूराव तारदाळे यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**०२.** सदर दावे कामी मयताचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. तथापि, वारस अभिलेखावर आणणेकरिता विलंब झाला असलेमुळे विलंब माफ होऊन व अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळणे आवश्यक आहे. मयत दादासाहेब बाबुराव तारदाळे हे दि.०५/०९/२०२१ रोजी मयत झाले असून कायदयानुसार मयताचे वारस अभिलेखावर आणणेकरिता ९० दिवसांचा कालावधी आहे. त्यानंतर तेथून पुढे ६० दिवसांच्या आत ॲबेटमेंट सेट असाईड मिळणेकरिता मुदत आहे.

कोरोना (कोव्हीड-१९) या महामारीच्या संसर्गजन्य आजारामुळे राज्यामध्ये लॉकडॉऊन झालेला होता व त्याकाळात कोर्ट कामकाज देखील बरेच दिवस बंद होते, यातील मुळ वादी रावसाहेब बाबुराव तारदाळे हे देखील दि.०१/०२/२०२० रोजी मयत झाले असलेने, तसेच त्यांची पत्नी छाया रावसाहेब तारदाळे ह्या आजारी होत्या व सुशांत रावसाहेब तारदाळे यांचा अपघात झालेला असल्यामुळे त्यांच्या दोघांचेवर औषधोपचार चालु होते. त्यामुळे विलंब झाल्यामुळे अबेटमेंट झालेली आहे. सदरचा विलंब हा जाणून-बुजून केलेला नाही. त्यामुळे सदर अबेटमेंट सेट असाईड होऊन वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करणेत यावा, तसेच न्यायाच्या दृष्टीने मयत प्रतिवादी नं.०२ दादासो बाबूराव तारदाळे यांचे वारस अभिलेखावर आणणे करिता झालेला विलंब माफ करेणत यावा व अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळावी अशी विनंती करतात.

०३. सदर प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, वादींनी दिलेला अर्ज हा खोटा व खोडसाळपणाचा असून व त्यामधील मजकुर त्यांना मान्य व कबूल नाही. सदरचे वारस हे वेळेत अभिलेखावर आणणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व गरजेचे असताना, वादींना मयताचे ज्ञान असताना देखील केवळ वेळकाढूपणा वादी करीत आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती करतात.

०४. सदर दावेकामी प्रतिवादी क्र.०२ दादासो बाबुराव तारदाळे हे दि.०५/०९/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मुदतीच्या कायद्याचा विचार करता मयत प्रतिवादी क्र.०२ चे वारस ९० दिवसाच्या आत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. सदरचे वारस अभिलेखावर घेणेकरिता वादींना विलंब झालेला आहे. वादींनी मुदतीत मयत वारस अभिलेखावर घेतले नसलेने प्रतिवादी क्र.०२ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. सदर कामी वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब माफ होऊन अबेटमेंट सेट असाईड होणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे तसेच त्या कालावधीमध्ये कोर्ट कामकाज बंद असल्यामुळे वादींना प्रतिवादी क्र.०२ यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झाल्यामुळे सदरचा दावा हा प्रतिवादी क्र. ०२ विरुध्द अबेट झाल्याचे दिसून येते.

परंतू सदर कामी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी कोवीड–१९ आजाराच्या प्रादुर्भावामुळे मुदतीचा कालावधी वाढवण्या बाबत मार्गदर्शक तत्वे जाहीर केली. सदर मार्गदर्शक तत्वे लक्षात घेता, वादी यांनी अर्जात नमूद केलेले कारण हे पुरेशे व योग्य असल्याचे दिसून येत आहे. दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, सदरचा अबेटमेंटचा आदेश रद्द करुन वादींना वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करुन, वारस अभिलेखावर घेणेस परवानगी देणे न्यायोचीत वाटत आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** वादींचा नि. क्र. ९६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी क्र. ०२ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI

Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Date: 2023.07.15 16:39:28 +0530

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.१५/०७/२०२३ तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 15/07/2023 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 15/07/2023 |
| **Order uploaded on** | **:** | **15/07/2023** |